# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

---

**जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ 612 /2026** **दिनांक : 23/01/2026**

प्रति,

मा. सर्व प्राचार्य / संचालक,
सर्व क्रीडा संचालक / क्रीडा अधिकारी,
गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये, गडचिरोली.

**विषय : भारत स्पोर्ट्स पोर्टलवर खेळाडूंची ऑनलाइन नोंदणी करण्याबाबत..**

संदर्भ : राजभवन, मुंबई यांचे पत्र क्र. RB/Edn.1/Gen-2026/CR-018/42, दिनांक 19 जानेवारी 2026.

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार माननीय राज्यपालांचे सचिव यांच्या निर्देशान्वये राज्यातील विद्यापीठांशी संलग्न सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा नैपुण्याची डिजिटल नोंद ठेवण्याच्या उद्देशाने **भारत स्पोर्ट्स** हे डिजिटल पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

त्यानुसार गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत संलग्न सर्व महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

- आपल्या महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत सर्व खेळाडू विद्यार्थ्यांची क्रीडा नैपुण्याची माहिती भारत स्पोर्ट्स पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक राहील.
- आंतरमहाविद्यालयीन, विद्यापीठीय, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या खेळाडूंची माहिती अचूक व पूर्ण स्वरूपात नोंदविण्यात यावी.
- भविष्यातील क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण, निवड प्रक्रिया व क्रीडा महोत्सव यासाठी ही नोंद महत्त्वाची असल्याने जास्तीत जास्त खेळाडूंची नोंदणी करण्याबाबत विशेष प्रयत्न करावेत.
- सदर कार्यवाहीसाठी प्राचार्यांनी संबंधित क्रीडा संचालक / क्रीडा अधिकारी / शारीरिक शिक्षण संचालक यांची बैठक घेऊन आवश्यक सूचना व मार्गदर्शन द्यावे.

भारत स्पोर्ट्स पोर्टलवरील नोंदणीची कार्यवाही तातडीने व वेळेत पूर्ण करण्यात यावी. वरील परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**(डॉ. अनिता लोखंडे)**
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति माहिती :

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

GOVERNOR'S SECRETARIAT
RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

RB/Edn.1/Gen-2026/CR-018/42

19, जानेवारी २०२६

प्रति,

मा. कुलगुरू,
राज्य विद्यापीठे (सर्व).

विषय : आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील खेळाडूंची 'भारत स्पोर्ट्स पोर्टलवर' ऑनलाईन नोंदणी करणे बाबत.

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहेच की, माननीय राज्यपालांचे सचिव यांचे निर्देशानुसार राज्यातील विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा नैपुण्यांची डिजिटली नोंद व्हावी या उद्देशाने "भारत स्पोर्ट्स" या नावाने डिजिटल पोर्टल तयार करण्यात आले आहे. आपणास हेही विदित असेल की, या वर्षाच्या "क्रीडा महोत्सव २०२५" साठीची कॉलेजनिहाय स्पर्धेत भाग घेणा-या विद्यार्थ्यांची "नोंदणी ते प्रमाणपत्र" याबाबतची डिजिटल नोंद भारत स्पोर्ट्स पोर्टल मार्फत करण्यात आली.

या संदर्भात मला आपणास अशी विनंती करण्याचे निर्देश आहेत की भारत स्पोर्ट्स या पोर्टलवर आपल्या विद्यापीठाशी संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची त्यांच्या क्रीडा नैपुण्याची नोंद भारत स्पोर्ट्स या पोर्टलवर घेणे आवश्यक आहे ज्यायोगे अशा विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी सुनियोजित प्रकारे प्रशिक्षण उपलब्ध करुन देता येवू शकेल, अशी धारणा आहे.

ही बाब लक्षात घेऊन आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या क्रीडापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील खेळाडूंची "भारत स्पोर्ट्स" पोर्टलवर ऑनलाइन नोंदी ठेवण्याकरिता आपल्या स्तरावरून महाविद्यालयाच्या सर्व प्राचार्यांना पत्राद्वारे निर्देशित करण्यात यावे व जास्तीत जास्त खेळाडूंची ऑनलाईन नाव नोंदणी करण्याकरिता विद्यापीठातील क्रीडा विभागामार्फत पाठपुरावा करण्यात यावा. यासाठी आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांची ऑनलाईन बैठक आयोजित करून, खेळाडूंची नाव नोंदणी करण्याकरिता दिशा निर्देश द्यावेत.

आदरपूर्वक.

19/1/2026

(विकास कुलकर्णी)
मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी)